**नियमीत दिवाणी दावा क्रमांक ७१६/२०२५**
चंद्रकला वि. ज्ञानोबा
निशाणी क्रमांक **१२८**
CNR No. MHOS140008862025

**प्रतिवादी क्रमांक ५ व ६ तर्फे साक्षीदार क्रमांक ३ अर्जुन संभाजी शिंदे यांचा शपथेवर पुढील सरतपास**

१. आता मला खरेदीदस्त निशाणी क्र. ११६ व निशाणी क्र. ११७ अनुसार दाखल २ खरेदीदस्त दाखविण्यात आले. सदर दोन्ही खरेदीदस्तावर साक्षीदार म्हणून माझ्या सहया आहेत. तसेच दुसरा साक्षीदार आबाराव बाबुराव क्षिरसागर यांच्या देखील सहया आहेत.

**वादी तर्फे उलटतपास विधिज्ञ एन. व्ही. सूर्यवंशी यांच्याकडून**

२. प्रतिवादी क्र. ४ बाबासाहेब ज्ञानोबा शिंदे उर्फ वारीक यांना मी ओळखत असून आम्ही दोघे एकाच गावातील रहिवासी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ४ हे माझे जवळचे मित्र आहेत. मौजे अनाळा ग्रामपंचायतीमध्ये मी सदस्य म्हणून सन १९८९ ते १९९४ पर्यंत कार्यरत होतो. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी हे माझ्या प्रभागातील रहिवासी आहेत. खरेदीदस्त निशाणी क्र. ११६ व ११७ एकाच दिवशी म्हणजेच दि.२०.१०.१९९५ रोजी नोंदविण्यात आले आहेत. खरेदीदस्तावर साक्षीदार म्हणून सही करण्यासाठी मला ज्ञानोबा शिंदे उर्फ वारीक याने बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीदस्त मी सही करण्यापूर्वीच लिहून तयार करण्यात आलेला होता. खरेदीदस्त माझ्या समक्ष लिहून मला वाचून दाखविण्यात आले होते. खरेदीदस्त वांगुरकर यांनी लिहिलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीदस्तातील मजकूर प्रतिवादी क्र. ४ बाबासाहेब यांच्या सांगण्यावरुन लिहिण्यात आलेला होता.

३. चंद्रकांत शिंदे याने गट क्र. ५०७ मधील जमीन २ हे. ९४ आर खरेदीदस्त निशाणी क्र. ११६ अन्वये खरेदी घेतली. सूर्यकांत शिंदे याने गट क्र. ३७२ मधील १ हे. ७७ आर जमीन खरेदीदस्त निशाणी क्र. ११७ अन्वये खरेदी घेतली आहे. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीदस्त निशाणी क्र. ११६ व ११७ मधील खरेदी व्यवहाराबाबत मला व्यक्तिशः कोणतीही माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, बाबासाहेब ज्ञानोबा शिंदे व

ज्ञानोबा शिंदे यांना शेती व्यवसायाशिवाय दुसरे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. हे म्हणणे खरे आहे की, बाबासाहेब हा ज्ञानोबाचा एकुलता एक मुलगा असल्याकारणाने तो त्यांचा लाडका होता. हे म्हणणे खरे नाही की, बाबासाहेब व ज्ञानोबा हे दोघे एकत्र राहत होते.

४. वर नमूद दोन्ही दस्तांना माझ्यासह दुसरा साक्षीदार आबाराव, सूर्यकांत, चंद्रकांत , ज्ञानोबा व मीरा हे सर्व लोक हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, बाबासाहेब शिंदे हे माझे चांगले मित्र असल्याकारणाने मी त्यांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**प्रतिवादी क्रमांक ३ व ४ याचा व त्यांच्या विधीज्ञांचा पुकारा केला असता ते गैरहजर त्यांच्या वतीने साक्षीदारांचा उलटतपास नाही.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH

Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2026.07.13 16:36:35 +0530

दिनांकः–१३.०७.२०२६

**अ. अ. शेख**

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/Order/Record and Document are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | G.I. Khobre<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 13-07-2026 |
| Order signed by the presiding officer on | - | 13-07-2026 |
| Order uploaded on | - | 13-07-2026 |